राज्यातील सर्व शिधापत्रिकाधारकांना रास्तभाव दुकानांमार्फत स्वस्त दराने तुरडाळ विक्री व वितरणाच्या अनुषंगाने जमा व खर्चाबाबत मार्गदर्शक सुचना.

महाराष्ट्र शासन

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग

शासन परिपत्रक क्र. विसवउस/कार्या-४(अर्थ)/२०१७-१८/तुरडाळ

जी.टी. हॉस्पिटल कॉम्प्लेक्स, ८ वा मजला,
लो.टि. मार्ग, मुंबई- ४०० ००१
दिनांक: ०५/०५/२०१८

वाचा :- १. अ.ना.पु.व ग्रा.सं.विभाग शासन परिपत्रक क्र.अधापु-२०१७/प्र.क्र.१८५/नापु-२२, दि.३० नोव्हेंबर २०१७
२. शासन परिपत्रक क्र. विसवउस/कार्या-४(अर्थ)/२०१७-१८/तुरडाळ/१९६७, दि.११ डिसेंबर २०१७
३. अ.ना.पु.व ग्रा.सं.विभाग शासन परिपत्रक क्र.अधापु-२०१७/प्र.क्र.१८५/नापु-२२, दि.३ मे २०१८

परिपत्रक:-

राज्य शासनामार्फत बाजार हस्तक्षेप योजनेअंतर्गत खरेदी करण्यात आलेल्या तुरीची भरडाई केल्यानंतर तुरडाळीची विक्री राज्यातील स्वस्त धान्य दुकानातून करण्याबाबतचा निर्णय सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग शासन निर्णय दि.२८ नोव्हेंबर २०१७ नुसार घेण्यात आला आहे. सदर भरडाई केलेल्या तुरडाळीची विक्री सर्व शिधापत्रिकाधारकांना रास्तभाव धान्य दुकानामार्फत वितरीत करावयाच्या सुचना संदर्भीय दि.३० नोव्हेंबर २०१७ च्या शासन परिपत्रकान्वये सुचना देण्यात आल्या आहेत. त्यामध्ये संदर्भ क्रमांक ३ नुसार तूरडाळीची विक्री मोठया प्रमाणात व्हावी, यादृष्टीने तूरडाळ विक्रीकरीता रास्तभाव दुकानदारास रु.३/- प्रतिकिलो एवढी मार्जिन देण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे. त्याअनुषंगाने वरील दिनांक ११ डिसेंबर २०१७ च्या मार्गदर्शक सुचना मध्ये बदल करण्यात येत असुन खालील कार्यपध्दतीचा अवंलब करण्यात यावा.

१. स्वस्त धान्य दुकानदारास लागणारी/मागणीनुसार अपेक्षित तुरडाळ खरेदीची रक्कम रु.५५ प्रति किलो प्रमाणे एकत्रित रक्कमेपैकी दुकानदाराचे मार्जिन वजा जाता रु.३ प्रति किलो वजा जाता उर्वरीत रक्कम रु.५२ प्रति किलो रास्त दुकानदाराकडून जिल्हा पुरवठा अधिकारी/अन्नधान्य वितरण अधिकारी यांनी जिल्हाधिकारी यांचे स्वीय प्रपंजी लेख्यात मुख्य लेखाशिर्ष ४४०८०१७५ खाली ग्रास प्रणालीद्वारे जमा करुन घ्यावी. तसेच मुंबई/ठाणे शिधावाटप क्षेत्राकरिता सदरहू रक्कम एकत्रित धनाकर्ष वि. स. व उ. स. यांचे स्वीय प्रपंजी लेख्यात मुख्य लेखाशिर्ष ४४०८०१६६ खाली नेहमीच्या पध्दतीने उपनियंत्रक परिमंडळ कार्यालयामार्फत वि.स.उ.स. कार्यालयात जमा करावीत.
२. जिल्हयातील स्वस्त धान्य दुकानदाराकडून मागणी केलेल्या तुरडरळीप्रमाणे जिल्हा पुरवठा अधिकारी/अन्न धान्य वितरण अधिकारी व उपनियंत्रक परिमंडळ कार्यालय मुंबई यांनी प्रति किलो रु.५० प्रमाणे एकत्रित रक्कम NEFT/RTGC द्वारे दि महाराष्ट्र स्टेट को ऑपरेटीव्ह फेडरेशन मुंबई यांचे नावे Indian Bank, Br.Mandvi, Masjid Bandar, Mumbai (IFSC Code-IDIB०००M०१३) या बँकेतील ७८६९५९९४८ या खाते क्रमांकावर जमा करावी. सदर तुरडाळ खरेदी खर्चाची रक्कम

जिल्हयांनी मुख्य लेखाशिर्ष ४४०८ ००९५ व मुंबई क्षेत्रासाठी ४४०८ ००७७ या लेखाशिर्षामधून करण्यात यावा.

३. द्वारपोच अंतर्गत तुरडाळ वाहतुक व हमालीच्या रक्कमांचे प्रदान जिल्हा पुरवठा अधिकारी/अन्नधान्य वितरण अधिकारी यांनी मुख्यलेखाशिर्ष ४४०८ ०२७३ व वि. स. व उ. स., अ.ना.पु. व ग्रा.सं. विभाग यांनी मुख्यलेखाशिर्ष ४४०८ ०२६४ खाली स्वीय प्रपंजी लेख्यामधून खर्च करावा.

४. तुरडाळ विक्रीपोटी जमा होणाऱ्या रकमा व प्रदान करावयाच्या रकमा या सर्व बाबतीत जिल्हा पुरवठा अधिकारी/अन्नधान्य वितरण अधिकारी यांनी सर्व यंत्रणेसोबत ताळमेळ ठेवावे तसेच तुरडाळ विक्री संपल्यानंतर एक महिन्याच्या आत तुरडाळ विक्री, जमा रक्कम व खर्च याच्या हिशोबासह उर्वरीत रक्कम वि. स. व उ. स. कार्यालयात लेखाधिकारी, वित्तीय सल्लागार व उपसचिव मुंबई याचे नावे असलेल्या Axis Bank, Marine line Branch, Mumbai (IFSC Code-UTIB००२३३) खाते क्र.२३३०१०२००००००६४८ या खाली NEFT/RTGSद्वारे जमा करावी व तसे या कार्यालयास NEFT/RTGS नंबर सह अवगत करावे.

५. सदर निर्णय हा शासन परिपत्रक निर्गमित झाल्याच्या दिनांकापासुन लागू राहील.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०१८०५०५१७०००४०६०६ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Satyavan Kisanrao Ubale

Digitally signed by Satyavan Kisanrao Ubale
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Food,civil Supplies and Consumer Protection Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=46312f6d99372bbfaa1abf8afd92601cfe82b77598529968ecb9b717b86ddc13, serialNumber=cfdaf958228a997f0edd8c32876eb1e49285efc7850109e7abb75654a9030a24, cn=Satyavan Kisanrao Ubale
Date: 2018.05.05 17:04:01 +05'30'

(स.कि.उबाळे)
वित्तीय सल्लागार व उप सचिव

प्रत,

१) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
२) मा.मंत्री, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,यांचे खजगी सचिव
३) मा.विरोधी पक्षनेता,विधानपरिषद,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,मुंबई
४) मा.विरोधी पक्षनेता,विधानसभा,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,मुंबई
५) मा.राज्यमंत्री, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,यांचे खजगी सचिव
६) मा.मुख्य सचिव यांचे उपसचिव
७) प्रधान सचिव, वित्त विभाग,मंत्रालय,मुंबई
८) सर्व प्रशासकीय विभाग प्रमुख,मंत्रालय,मुंबई
९) सर्व विभागीय आयुक्त
१०) नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई
११) सर्व जिल्हाधिकारी

१२) सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी/अन्नधान्य वितरण अधिकारी
१३) सर्व उपआयुक्त (पुरवठा) विभागीय आयुक्त कार्यालय
१४) उपसचिव, नापु-२२ अ.ना.पु.व ग्रा.सं.विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१५) उपसंचालक, पुरवठा आयुक्त कार्यालय, मुंबई
१६) संचालक नागरी पुरवठा (गो/वा) मुंबई
१७) महालेखापाल (लेखा परिक्षा),महाराष्ट्र-१,मुंबई
१८) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता),महाराष्ट्र-१,मुंबई
१९) महालेखापाल (लेखा परिक्षा),महाराष्ट्र-२,नागपूर
२०) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता),महाराष्ट्र-२,नागपूर
२१) वि. स. व उ. स. कार्यालयातील सर्व कार्यासने.